



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५० वा | बुधवार दि ०३ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भाजपचा डाव करेक्ट ओळखला, भाई सावध; शिंदेंचा देवाभाऊ पॅटर्न, यंदा ती चूक शिताफीनं टाळली

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यातील नगर पंचायत, नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी आज मतदान झालं आहे. या निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार होता. पण आता निकालासाठी २१ डिसेंबरची प्रतीक्षा करावी लागणार आहे. या निवडणुकीत अनेक ठिकाणी सत्ताधारी पक्षांमध्येच जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली. विशेषत: भाजप आणि शिंदेसेना यांच्यातील संघर्ष टोकाला गेला. २०२२ मध्ये शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठी फूट राज्यानं पाहिली. एकनाथ शिंदे ४० आमदारांसह सत्तेतून बाहेर पडले. त्यांनी भाजप सोबत हातमिळवणी करत सत्ता स्थापन केली. शिंदेंच्या बंडामुळे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकार कोसळलं. यानंतर शिंदे मुख्यमंत्री झाले. कोणाच्या ध्यानीमनी नसताना ते सर्वोच्च पदावर गेले. अडीच वर्षे मुख्यमंत्री राहिले. त्यांच्यात नेतृत्वात महायुतीनं लोकसभा, विधानसभा निवडणुका लढवल्या. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपनं बऱ्याच ठिकाणी स्वबळाचा नारा दिला. त्यामुळे शिंदेसेनेनं स्थानिक पातळीवर विविध पक्षांशी आघाडी, युती केली. तळकोकणात तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशीदेखील युती करण्यात आली. उपमुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे सेनेचे प्रमुख नेते म्हणून यंदा प्रथमच अनेक ठिकाणी भाजप सोबत युती न करता लढत आहेत. पण या निवडणुकीत त्यांनी तब्बल ५३ प्रचारसभा घेतल्या. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३७ सभांना संबोधित केलं. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सत्ताधाऱ्यांनी अक्षरश: व्यापून टाकली. शिंदे यांनी राज्यभरात दौरे करत प्रचारसभांचा अक्षरश: सपाटा लावला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्या त्या भागातील नेत्यांकडे सोपवल्या जात होत्या. पण तो काळ आता मागे पडला आहे. २०१४ पासून राज्यात हा पॅटर्न बदलला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजप सगळ्याच निवडणुका पूर्ण तयारीनिशी लढू लागला. सर्वच निवडणुकांमध्ये भाजपनं संपूर्ण ताकद पणाला लावण्यास सुरुवात केली. प्रत्येक निवडणूक भाजपनं गांभीर्यानं लढवली. देवेंद्र फडणवीस यांनी सभांचा सपाटा लावला. याचा भाजपला मोठा फायदा झाला. भाजप राज्यातील नंबर एकचा पक्ष झाला. आता शिंदे तोच पॅटर्न राबवत भाजपला टक्कर देण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजप २०२९ मध्ये स्वबळावर लढणार हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी स्पष्ट केलेलं आहे. भाजपला कुबड्यांची गरज नाही, असं थेट विधान शहांनी केलेलं आहे. त्यानुसार प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अनेक ठिकाणी मित्रपक्षांची नाकाबंदी सुरु केली आहे. ही खेळी ओळखून शिंदेही कामाला लागले. त्यांनीही झंझावाती प्रचार करत भाजपला तोडीस तोड यंत्रणा राबवली. अनेक प्रचारसभांमधून थेट आपल्या मंत्र्यांना फोन लावले. ते स्पीकरवर ठेवून त्यांनी दिलेली आश्वासनं स्थानिकांना ऐकवली आणि सभा गाजवल्या. २०१४ पासून राज्याच्या राजकारणाचा पोत बदलला. भाजप ३६५ दिवस राजकारण करु लागला. पंतप्रधान मोदी आणि अमित शहांच्या भाजपनं निवडणुकीसाठी स्वतंत्र व्यवस्थापन करण्यास सुरुवात केली. त्याचे फायदेही दिसून आले. ज्या पक्षांना या प्रकारे राजकारण, निवडणूक व्यवस्थापन जमलं नाही, ते मागे पडत जमले. या सगळ्याची जाणीव शिंदेंना आहे. त्यामुळेच भाजप स्वबळावर लढत असताना, प्रचारसभांचा धुरळा उडवत असताना शिंदेही मागे राहिले नाहीत. फडणवीस यांच्या प्रमाणे त्यांनीदेखील प्रचारसभांचा सपाटा लावला २०१५ मध्ये कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक झाली होती. त्यावेळी शिंदे राज्य सरकारमध्ये मंत्री होती. भाजप-शिवसेनेनं ठाणे, कल्याण-डोंबिवलीत कायम युतीत महापालिका निवडणूक लढवली. पण २०१४ च्या विधानसभा निवडणुकीआधी युती तुटली. भाजपनं स्वबळावर १२२ जागा जिंकल्या. शिवसेनेला ६३ जागांवर यश मिळालं. त्यानंतर भाजपच्या अपेक्षा वाढल्या. विरोधात लढलेली शिवसेना काही महिन्यांनंतर सत्तेत सहभागी झाली. कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक २०१५ मध्ये लागली. भाजपची ताकद पाहता ते स्वबळावर लढणार नाहीत. नेहमीप्रमाणे युती होईल, असा शिंदेंचा कयास होता. शिंदे त्यावेळी मंत्री तर होतेच, सोबतच ठाणे जिल्हाप्रमुख होते. महापालिका निवडणूक युतीत लढू, असाच त्यांचा विचार होता. पण फडणवीस यांनी डोंबिवलीचा दौरा केला. भेटीगाठी घेतल्या आणि स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. हा शिंदे यांच्यासाठी आश्चर्याचा धक्का होता.



# निवडणुकांचे निकाल लांबणीवर, उद्धव ठाकरेंची मोजक्या शब्दात प्रतिक्रिया; शिंदेंना टोले लगावत म्हणाले...

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी आज आणि निवडणुकांसाठी मतदान होत आहे. या निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार होता, परंतु काही नगरपरिषदांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने आता सरसकट सर्वच निकाल पुढे ढकलण्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा कोर्टात अपील प्रलंबित असलेल्या किंवा नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी पुरेसा वेळ न मिळालेल्या ठिकाणी निवडणुका आधीच २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकांसाठी मतदान झाल्यानंतर सर्व नगरपरिषद-नगरपंचायतींचे निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होतील. यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मोजक्या शब्दात पहिली प्रतिक्रिया आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून मातोश्रीवर रोजच पक्षप्रवेश सुरु आहेत. हवेत जसे प्रदूषण आहे तसे राजकारणात आहे. काँग्रेस बरोबर गेले म्हणून आम्ही युती तोडली. किंवा उद्धव ठाकरे यांच्या नावाची चर्चा करून धूळफेक करण्याचे काम करण्यात आले. धुळफेक केलेली असल्यामुळे कट्टर शिवसैनिक परत येतात. भाजप शिवसेनेवर अन्याय करतंय, म्हणून मी मंत्रिमंडळात त्यांच्या मांडीला मांडी लावून बसू शकत नाही, असं सांगत कल्याण डोंबिवलीच्या सभेत राजीनामा देतोय, सांगितल्याचं पाहिलंय, मग कधी अजित पवार निधी देत नाही, अशी अनेक कारणे ठाण्याची लोकं देतात. मला शिव्या घालत होते, पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आज त्यांच्या पोस्टरवर दिघे साहेबांच्या शेजारी सोनिया गांधी यांचा फोटो आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेनेचे वट आजही ठाण्यात आहे. ठाणे शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. तो अबाधित राखण्याचे काम तुम्हाला करायचं आहे. मशाल वेगळी ठेवा, भगव्यावर कोणतंही चित्र छापू नका, तो शिवरायांचा आहे, तो पवित्र आहे, तो तसाच फडकला पाहिजे, असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.



मशाल घेऊन पुढे चला, मशालीच्या तेजाने सर्व जळमटं जळून खाक होतील. इतरांनी जे केलं, ते तुम्ही करू नका, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या असताना, निवडणूक आयोगावर न बोललेलं चांगलं, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली.

# सोन्या-चांदीची झळाळी



जगभरात बचतीची आणि गुंतवणुकीची कितीही आधुनिक साधने आली, तरीही अडीनडीला उपयोगी पडते ते सोनेच, हे सोन्याच्या गेल्या काही दिवसांतील भावावरून स्पष्ट दिसून आले आहे. सोन्यासोबत चांदीही चांगलीच भाव खाऊन गेली आहे. आखाती प्रदेशात गेल्या काही दिवसांपासून अशांतता आहे. अमेरिकेकडून भारताबरोबरच्या व्यापारासाठी कोणतेच स्पष्ट संकेत अद्याप मिळालेले नाहीत. दोन्ही देशांतील व्यापार कराराच्या चर्चेच्या पुढील फेरीसाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात भारतात येणार आहे. यामुळे भारतीय आयात-निर्यातदारांमध्ये अस्वस्थता आहे. त्यातच अमेरिकी डॉलर गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात कमजोर झाला आहे. अमेरिकेच्या सरकारी रोख्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात घसरण झाली आहे. आता सर्वांचे लक्ष अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरलकडून नेमकी किती व्याजदर कपात केली जाते याकडे आहे. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून जगभरातील वित्तसंस्था, व्यापारी, दलाल ते सर्वसामान्य नागरिक या सर्वांकडून बेसुमार सोने खरेदी सुरू आहे. सौरऊर्जा, मोबाइल, विजेवरील वाहने असे नवे उद्योग जगभरात वेगाने फोफावत असल्यामुळे या उत्पादनांसाठी चांदीची खरेदी कारखान्यांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहे. यास्तव, सोन्याचा १० ग्रॅमसाठी सरासरी भाव एक लाख रुपये ते १.०३ लाख रुपयांमध्ये राहिला आहे. चांदीचा भाव प्रतिकिलो सरासरी १.१४ लाख रुपये ते १.१८ लाख रुपयांपर्यंत गेला आहे. सध्याचा सणासुदीचा काळ पाहता, सोने आणि चांदी यांची सर्वसामान्यांकडून खरेदी होणे साहजिक आहे. आगामी काळात सोन्याचा भाव खाली येण्याची फारशी शक्यता दिसत नाही. सोन्याचा भाव असाच चढा राहिला तर त्याच्या विक्रीवर निश्चित परिणाम होणार आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आजही फार कमी जण सोने गुंतवणुकीचे साधन म्हणून खरेदी करतात. बहुतांश खरेदी ही दागिन्यांसाठी केली जाते. एक दागिना घडवताना त्याची घडणावळ, जीएसटी असे अन्य शुल्क सोन्याच्या किमतीत मिळवल्यास सोने अधिक महाग पडताना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत आपण सोने खरेदी करण्यामागचा उद्देश बदलणे गरजेचे आहे. सोन्याची खरेदी यापुढे प्राधान्याने दागिन्यांसाठी न करता गुंतवणूक म्हणून करायला हवी. यामुळे सोन्याचा भाव वधारल्यावर ते विकताना आपल्या भावना त्यात गुंतलेल्या राहणार नाहीत. सध्याच्या महाग झालेल्या सोन्यापासून हा बोध घ्यायला काहीच हरकत नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# काँग्रेसचा सर्वात मोठा किल्ला धोक्यात? २ बलाढ्य नेत्यांमध्ये संघर्ष पेटला; भाजपचा प्लान ठरला





**बंगळुरु :** कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रिपदावरुन सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये आरपारची लढाई सुरु झाली आहे. दोन बलाढ्य नेत्यांमध्ये संघर्ष पेटल्यानं कर्नाटकात काँग्रेस समोर मोठं संकट उभं ठाकलं आहे. शिवकुमार आणि सिद्धरामय्या मागे हटण्यास तयार नाहीत. त्यामुळे आता हा विषय दिल्लीत हायकमंडसमोर जाणार आहे. तिथेच या प्रश्नाचा निकाल लागेल.दोन नेत्यांमध्ये थेट संघर्ष निर्माण झाल्यानं राज्यातील काँग्रेस दुभंगली आहे. शिवकुमार समर्थक आमदार आणि नेते मुख्यमंत्री बदलावा या मागणीसाठी आग्रही आहेत. तर मुख्यमंत्रिपदी असलेल्या सिद्धरामय्या यांनीदेखील लॉबिंगला वेग दिला आहे. आपली खुर्ची वाचवण्यासाठी ते दिल्लीला जाऊन काँग्रेस हायकमांडची भेट घेतीलदेशात तीन राज्यांमध्ये काँग्रेस स्वबळावर सत्तेत आहे. कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणात काँग्रेस सत्तेत आहे. कर्नाटक हा काँग्रेसचा सर्वात मजबूत किल्ला आहे. पण दोन नेत्यांमधील संघर्षामुळे राज्यात राजकीय कुरघोड्या सुरु आहेत. मुख्यमंत्रिपदावरुन दोन नेत्यांमध्ये स्पर्धा सुरु असल्याचा परिणाम पक्षाच्या प्रतिमेवर झाला आहे. डी. के. शिवकुमार आणि सिद्धरामय्या दोन्ही नेते जाहीरपणे एकमेकांविरोधात विधानं करत आहेत. काँग्रेसचे आमदार, नेते दोन गटात विभागले आहेत. त्यामुळे काँग्रेसचा मजबूत किल्ला ढासळण्याची लक्षणं दिसू लागली आहेत.कर्नाटक काँग्रेसमध्ये सत्ता संघर्ष रंगलेला असताना भाजप नं वेट अँड वॉचची भूमिका घेतली आहे. हा काँग्रेसचा अंतर्गत वाद असल्याचं भाजप नेते सांगत आहेत. भाजपला डी. के. शिवकुमार यांची गरज नाही. काँग्रेसकडे हिंमत असेल तर त्यांनी विधानसभा बरखास्त करावी आणि राज्यात निवडणूक घेऊन दाखवावी, असं खुलं आव्हान कर्नाटक भाजपचे नेते आणि केंद्रीय मंत्री व्ही. सोमन्ना यांनी दिलं आहे. सिद्धरामय्या विरुद्ध शिवकुमार वादापासून चार हात लांब राबण्याची योजना भाजपनं आखली आहे. काँग्रेसचे दोन्ही नेते मुरब्बी आहेत, याची कल्पना भाजपला आहे. हा संघर्ष जितका टोकाला जाईल, तितकं वातावरण काँग्रेसच्या विरोधात जाणार याची पूर्ण कल्पना भाजपला आहे. कर्नाटकातील जनता दर पाच वर्षांनी राज्यात सत्तांतर करते, याचीही जाणीव भाजपला आहे.राजस्थान काँग्रेसमध्येही असाच संघर्ष झाला होता. मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट आमनेसामने आले होते. तेव्हा भाजपनं वेट अँड वॉचची भूमिका घेतली. त्याचा फायदा २०२३ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला झाला. छत्तीसगढमध्ये मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि उपमुख्यमंत्री टी. एस. सहदेव यांच्यात संघर्ष झाला, तेव्हा भाजपनं कोणतीही घाई केली नाही. २०२३ मध्ये विधानसभा निवडणूक झाली. जनतेनं काँग्रेसची सत्ता घालवली आणि भाजपला प्रचंड बहुमत दिलं.

## भास्कर राव, आपला उमेदवार असताना कुणाला पाठिंबा देताय?



**रत्नागिरी :** कोकणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु असतानाच रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातच दोन गट पडल्याचे चित्र आहे. ठाकरे गटाचे सचिव विनायक राऊत यांनी चिपळूण येथील राजू देवळेकर यांचे नाव नगराध्यक्ष पदासाठी जाहीर केले आहे. याच वेळी महाविकास आघाडीतील शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार आणि माजी आमदार रमेश कदम यांना ठाकरेंचे शिलेदार भास्कर जाधव यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी जाहीर पाठिंबा दिला आहे. या पार्श्वभूमीवर थेट मातोश्रीवरुन भास्कर जाधव यांना समज देण्यात आल्याचे वृत्त आहे.विनायक राऊत यांनी ठाकरे गटाचे नगरसेवक राजू देवळीकर यांच्यासह २४ उमेदवार चिपळूण नगरपरिषदेत उभे केले आहेत. मात्र विनायक राऊत व भास्कर जाधव या दोन्ही नेत्यांमधील वाद ऐन निवडणुकीतच चव्हाट्यावर आले आहेत. भास्कर जाधव यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कदम यांना पाठिंबा जाहीर केला असतानाच विनायक राऊत यांनी मात्र चिपळूण येथे येऊन आमची महाविकास आघाडी झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे. यानंतर भास्कर जाधव यांची नाराजी असल्याचं स्पष्ट झालं. त्यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीजवळ बोलताना मला एका निर्णयापर्यंत यावं लागेल असे बेधडक विधान केलं होतं.यानंतर भास्कर जाधव यांनी रमेश कदम यांचा जाहीरपणे सभा घेत प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमिवर थेट मातोश्रीवरून भास्कर जाधव यांना संपर्क साधण्यात आल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे.

## एकनाथ शिंदेंच्या जाहीर सभेत फोटोग्राफरवर गुन्हा

**नंदुरबार :** तळोदा येथे शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मिल कंपाउंडमध्ये हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी हेलिपॅड बनवण्यात आला होता. त्यामुळे परिसरात 'नो फ्लाय झोन' घोषित करण्यात आला होता. परंतु या ठिकाणी विना परवानगी ड्रोन उडवणाऱ्या फोटोग्राफरच्या विरोधात तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळोदा शहरात २७ नोव्हेंबर रोजी नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेना उमेदवारासाठी प्रचार सभा घेण्यात आली होती. या सभेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते..उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षिततेसाठी मिल कंपाऊंड परिसरामध्ये जिल्हाधिकारी डॉक्टर मित्ताली सेठी यांनी 'नो फ्लाय झोन' घोषित केला होता. परंतु या आदेशांचे उल्लंघन करत फोटोग्राफर मयुर साठे याने सार्वजनिक सुरक्षितता भंग करून इतरांच्या जीवाला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेता या भागात ड्रोन उडवले होते.

## थकून घरी गेल्यावर मच्छरदाणीत बायकोसोबत झोपा : महाजन



**जळगाव :** राज्याचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी बांधकाम कामगारांसाठी असलेल्या सरकारी योजनांवर बोलताना केलेल्या एका वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे. जिल्ह्यातील भडगाव येथील जाहीर सभेत बोलताना त्यांनी बांधकाम कामगारांना सरकार देत असलेल्या योजनेचा उल्लेख करताना 'नवरा-बायको मच्छरदाणीत झोपा' असा सल्ला दिला.भडगाव येथील सभेत बोलताना गिरीश महाजन यांनी बांधकाम कामगारांसाठी असलेल्या सरकारी सुविधांचा उल्लेख केला. याच संदर्भात, कामगारांना सरकारने दिलेल्या वस्तूंपैकी मच्छरदाणीचा उल्लेख करताना त्यांनी मिश्कील टिप्पणी केली. बांधकाम कामगारांना सरकारने मच्छरदाणी दिली आहे. त्यामुळे थकून आल्यावर मच्छरदाणीत बायकोसोबत झोपा, असा सल्ला महाजन यांनी दिला. या वेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.बांधकाम कामगारांना पेट्या मिळाल्यात. त्या किटमध्ये ग्लोव्हज आहेत, बॅटरी आहे, डबा दिला आहे, मच्छरदाणी पण दिली आहे. कामावरुन थकून भागून घरी गेलात तर नवरा बायकोने मच्छरदाणीत झोपा. डास चावता कामा नये.' असं गिरीश महाजन म्हणाले. अशा योजना ठेकेदारांचे भले करण्यासाठी आणल्या जातात. मात्र तुम्ही देत असलेली मच्छरदाणी लावायची कुठे, मच्छरदाणी लावण्यासाठी गरज नाही, अशा शब्दात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांच्या वक्तव्यावर पलटवार केला.

## आधी पक्षांतराचे संकेत, आता थेट शिंदेंच्या व्यासपीठावर; मातब्बर नेता 'घड्याळ' सोडणार?






**सातारा :** नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने फलटणमध्ये मोठी राजकीय घडामोडी झाली आहे. विधान परिषदेचे माजी सभापती आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) विधान परिषदेचे आमदार रामराजे नाईक-निंबाळकर आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रचार सभेच्या व्यासपीठावर दिसले. निवडणूक जाहीरनाम्याच्या प्रकाशनानंतर दोघांनी एकमेकांचा हात उंचावला. त्यामुळे रामराजे राष्ट्रवादी सोडून शिवसेनेत जाणार का?, अशी चर्चा सुरु झाली आहे. रामराजेंचे पुत्र अनिकेतराजे यांनी काही दिवसांपूर्वीच शिवसेनेत प्रवेश केला होता. ते फलटणच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. अनिकेतराजेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे पॅनेल रिंगणात आहे. फलटण तालुक्यात रामराजे आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर तसेच मंत्री जयकुमार गोरे यांच्यात विळ्या भोपळ्याचे सख्य आहे. रामराजेंनी आपल्या मुलाला नगराध्यक्ष पदाच्या रिंगणात उतरवताच रणजितसिंह निंबाळकरांनी आपले भाऊ समशेरसिंह यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे फलटण नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागून आहे.विधानसभा निवडणुकीत फलटणची जागा राष्ट्रवादीची असल्याने महायुतीच्या फॉर्म्युलानुसार ती अजित पवार गटाला सोडण्यात आली. त्याचवेळी रणजितसिंह निंबाळकरांनी राजकीय खेळी करून त्यांचे कट्टर समर्थक सचिन कांबळे-पाटील यांना राष्ट्रवादीत पाठवले. अजितदादांनी त्यांना उमेदवारीही दिली. पक्षाचे विधान परिषद आमदार असूनही रामराजे निवडणूक काळात तटस्थ होते. रामराजेंचे चुलत बंधू संजीवराजे आणि तत्कालीन आमदार दीपक चव्हाण हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात होते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा दीपक चव्हाण यांनाच उमेदवारी दिली. महायुतीचे सचिन कांबळे पाटील यांनी दीपक चव्हाण यांचा पराभव केला.

फलटण तालुक्यात रणजितसिंह निंबाळकर आणि मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रशासकीय दहशत निर्माण केली असल्याचा आरोप रामराजे वारंवार करत होते. त्यांच्या चुकीच्या कामांना राज्यातील भाजप नेतृत्वाने पाठबळ देऊ नये, अशीही रामराजेंची मागणी होती. त्यामुळे महायुतीत असूनही रामराजे आणि निंबाळकर-गोरे यांच्यात संघर्ष पेटत राहिला. नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने रामराजेंनी वेगळाच पवित्र घेतला. थेट धनुष्यबाण चिन्हावरच त्यांनी पॅनल उभे केले आहे. काही दिवसांपूर्वी एका सभेत बोलताना राष्ट्रवादीतच राहायचं की दुसऱ्या पक्षात जायचं ते मला कळतं. तेवढी माझी अजून बुद्धी चालते, असं वक्तव्य केलं होतं. त्यामुळे मुलाच्या प्रचार सभेत रामराजेंनी एकनाथ शिंदे यांच्या हातात हात घालून नेमका कोणता संदेश दिलाय? हे नजीकच्या काळात स्पष्ट होईल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चांगले राहा बाळांनो, आईची काळजी घ्या', स्टेटस ठेवून बापाने रेल्वेखाली आयुष्य संपवलं

**सोलापूर :** कर्ज झाल्यानं मानसिक तणावातून सोलापूरमधील एका युवकाने रेल्वेखाली आत्महत्या केली. ही घटना काल शुक्रवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजी महाराज तलावाजवळील रेल्वे पुलाच्या परिसरात घडली. जुबेर मशाक शेख (वय ४३, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, सध्या शास्त्री नगर) असं आत्महत्या केलेल्या इसमाचं नाव आहे. जुबेरनं आत्महत्येपूर्वी 'मला माफ कर देवा' असं स्टेटसला ठेवलं. शासकीय रुग्णालयात सावकारांच्या त्रासाला कंटाळूनच जुबेर यांनी आत्महत्या केली आहे, त्यामुळे सावकारांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाइकांकडून करण्यात आली आहे. तसेच आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. पोलिसांनी आश्वासन दिल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.जुबेर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी एक व्हिडिओ बनवला होता, त्यात त्यांनी आपल्या मुलांना, 'तुम्ही चांगले राहा, चांगलं शिक्षण घ्या, आईची काळजी घ्या', असं भावनिक आवाहन केलं होतं. यानंतर जुबेर यांनी आपला मोबाइल घरात ठेवून ते निघून गेले. त्यानंतर ते पुन्हा परतलेच नाहीत. काल शुक्रवारी, दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्यांच्या मृत्यूची बातमी कळाली.जुबेर शेख हे आदल्या



दिवशी म्हणजे गुरुवारी रात्री २ वाजेपर्यंत एका व्यक्तीशी बोलत होते. तेव्हापासून ते जास्त दडपणात होते, अशी माहिती नातेवाइकांनी दिली. नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात माध्यमांना माहिती देताना सांगितले, 'जोपर्यंत सावकारांवर कारवाई हो नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही', अशी भूमिका नातेवाइकांनी घेतली होती. सोलापूर शहर पोलिसांनी समजूत काढून आश्वासन दिल्यानंतर मृतदेह ताब्यात घेतला. रात्री नऊच्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि बहीण असा परिवार आहे.मी जुबेर शेख, मला जुगाराचा नाद लागला. मी अनेक ठिकाणाहून कर्ज घेतलं. मला काय करावं हे कळत नाहीये. मी आत्महत्या करत आहे. यासाठी कोणीही जबाबदार नाही. मी कोणत्याही सावकारांचे नाव घेत नाही. सावकारांनी कुटुंबीयांना त्रास देऊ नये. मी त्यांचे खूप व्याज भरले आहे. सावकारांच्या मनात दया यावी, त्यांनी माझ्या कुटुंबीयांना त्रास देऊ नये. ज्यांनी उधार दिले आहेत, त्यांना विनंती आहे की, मी काही जणांना पैसे दिले आहेत. ते पुढील २ ते ३ महिन्यात माझ्या आईच्या हातात पैसे देतील. काही जणांकडे माझे पैसे दिले आहेत, असे सांगून काही जणांची नावे त्यांनी या व्हिडिओमध्ये घेतलेली आहेत.

## घरात सावत्र भावंडे, मालमत्तेवरुन तुफान राडा, सासूलाच संपवलं

**घाटकोपर :** येथील वृद्ध महिलेच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी तिच्या सावत्र सुनेला अटक केली आहे. संपत्तीच्या वादातून तिने सासूची हत्या केल्याचे समोर आले आहे. मुमताज काझी असे आरोपीचे नाव असून, तिने सासूचे दागिने चोरल्याचा आरोप आहे. घाटकोपर पश्चिमेकडील मुकुंद सोसायटीमध्ये शहनाज या अनेक वर्षांपासून एकट्या वास्तव्याला होत्या. बुधवारी दि. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी त्या घरात मृतावस्थेत आढळल्या. घाटकोपर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपास हाती घेतला.उलवे सेक्टर २५अ परिसरात २२ वर्षीय कुमकुम बलविंदर कौर या तरुणीने आपल्या आयुष्याची अखेर केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात तिने जीव देण्यापूर्वी रेकॉर्ड केलेल्या व्हॉईस नोटने तपासाला नवं वळण दिलं आहे. कुमकुमने टोकाचं पाऊल उचलण्यापूर्वी आपल्या मित्र संदीप याला पाठवलेल्या ऑडिओमध्ये तिने आपल्या शेजारीण अंजली शर्मा (वय २५) हिच्यामुळे ती मानसिकरीत्या त्रस्त झाल्याचा उल्लेख केला आहे.घटनेनंतर कुमकुमचे कुटुंबीय पंजाबहून नवी मुंबईत आले आणि त्यांनी उलवे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तिचा भाऊ गौरव बलविंदर कुमार यांनी तक्रारीत नमूद केले आहे की, अंजली शर्मा गेल्या काही महिन्यांपासून कुमकुमला सतत मानसिक त्रास देत होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अंजली शर्माला ताब्यात घेतले असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन राजणे यांनी दिली.पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करताना राखाडी-पांढरा स्कार्फ जप्त केला आहे. हा स्कार्फ कुमकुमन जीव देण्यासाठी वापरला गेला असावा, असा प्राथमिक संशय असून तो फॉरेन्सिक तपासासाठी पाठवण्यात आला आहे. यासोबतच कुमकुमचा मोबाईल फोन, कॉल डिटेल्स, संदेश, तसेच सम ाजमाध्यमावरील संभाषणांचेही विश्लेषण सुरू आहे.

## पुण्यात MPSC करणाऱ्या विद्यार्थ्याने जीव दिला

**पुणे :** नवी पेठ परिसरात स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या २६ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. सागर हा पूना हॉस्पिटलनजीक एका रूममध्ये 'पेइंग गेस्ट' पद्धतीने राहत होता. पहाटेच्या सुमारास राहत्या खोलीत तो मृतावस्थेत आढळून आला. पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवला. आत्महत्येचे ठोस कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्राथमिक तपासात तरुण मानसिक तणावाखाली असल्याची माहिती पुढे आली आहे. सागर पवार (वय २६, म ूळ गाव मेहेकर, जि. बुलढाणा) असे आत्म हत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. सागर मागील तीन-चार वर्षांपासून पुण्यात राहून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता. तो पुण्यातील मध्यवर्ती भाग असलेल्या नवी पेठ येथे काही मित्रांसोबत राहत होताशुक्रवारी दुपारच्या सुमारास त्याच्या खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे लक्षात आल्यानंतर मित्रांनी त्याला अनेकदा आवाज दिला, परंतु प्रतिसाद नाही मिळाला.

## लग्न करायचंय, प्रपोजही केलं; यूके रिटर्न इंजिनिअरने आयुष्य संपवलं

**हैदराबाद :** एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने प्रेमात अयशस्वी झाल्यामुळे निराश होऊन विष प्राशन करत आपल्या आयुष्याची अखेर केली. तेलंगणाच्या निजामाबाद जिल्ह्यात ही हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर संतप्त कुटुंबीयांनी या तरुणाचा मृतदेह पोलिसांच्या वाहनात फ्रीजरमध्ये ठेवला आणि प्रेयसीच्या गावी जाऊन निषेध करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता.मृत तरुणाचे नाव एन. श्रीकांत रेड्डी (वय २९) असं आहे. तो नुकताच युनायटेड किंग्डम (यूके) मधून त्याच्या प्रेयसीशी लग्न करण्यासाठी भारतात परतला होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा श्रीकांतने त्याच्या प्रेयसीला लग्नासाठी प्रपोज केले तेव्हा त्याला कळाले की तिच्या पालकांनी आधीच तिचं लग्न दुसऱ्याा कोणाशी लावून दिले आहे. या विश्वासघाताने तो खूप निराश झाला होता. त्यामुळे श्रीकांतने ६ नोव्हेंबर २०२५ रोजी विष प्राशन केले. कुटुंबाला याची माहिती होताच त्यांनी श्रीकांतला तात्काळ हैदराबादमधील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. जिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.या घटनेने कुटुंबात संताप निर्माण झाला होता. श्रीकांतच्या मृत्यूनंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्याऐवजी त्यांनी मृतदेह फ्रीजरमध्ये ठेवला आणि ते घेऊन मुलीच्या गावी तल्लारामपूर येथे निघाले. एरागटला पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा संतप्त कुटुंबीयांनी मृतदेह असलेला फ्रीजर पोलिसांच्या वाहनावर ठेवले आणि रस्त्यावर निदर्शने सुरू केली, ज्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती.अनेक तास कुटुंबीयांची सम जूत काढल्यानंतर पोलिसांनी कुटुंबाला मुलीच्या पालकांविरुद्ध जीव देण्यास प्रवृत्त करण्यासाठी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, योग्य कायदेशीर कारवाईचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर कुटुंबाने त्यांचे आंदोलन मागे घेतले.

# हजारो बिअर बॉटल घेऊन जाणारा कंटेनर उलटला; अडकलेल्या चालकाची मदतीसाठी विनवणी, पण लोकांनी पळवले बॉक्स

**छत्रपती संभाजीनगर :** बिअर बॉटलचे बॉक्स घेऊन जाणारा कंटेनर अचानक उलटला. अपघातात कंटेनरचा चालक केबिनमध्ये अडकला होता. मला बाहेर काढा अशी विनवणी तो करत होता. मात्र त्यानंतर माणुसकीला लाज आणणारा प्रकार घडला. काहींनी चालकाला बाहेर काढण्याऐवजी बिअरच्या बॉटल घेऊन पळून जाणं पसंत केलं. ही घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाळूज रांजणगाव शेणपुंजी फाट्यावर रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातामुळे दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.सय्यद अब्दुल्ला असं अपघातात जखमी झालेल्या चालकाचं नाव आहे. या प्रकरणी



स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, एका बियर उत्पादक कंपनीतर्फे एक कंटेनर दोन हजार बिअर बॉटल व बॉक्स घेऊन जळगावच्या दिशेने जात होता. हा कंटेनर वाळूज येथील धनुष्यबाण कमानीजवळ आला. मात्र इथं आल्यानंतर चालकाचे अचानक नियंत्रण सुटल्यामुळे ट्रक रस्त्यावर उलटून अपघात झाला. बिअर बॉक्स घेऊन जाणारा कंटेनर उलटल्यामुळे रस्त्यावर बिअर बॉटल बॉक्सचा खच पडला होता. या अपघातामुळे कंटेनरम धील डिझेल गळती झाली. बियर ट्रक पलटी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात जमाव जमला.जमाव बिअर बॉटल बॉक्स घेऊन जात होता. यावेळी ट्रकमध्ये अडकलेल्या चालक मदतीसाठी विनवणी करत असताना त्याला बराच वेळ मदत मिळाली नाही. घटनेची माहिती पोलिसांना मि ळताच पोलिसांनी अग्निशामक विभागाला पाचारण केले. अखेर जमावावर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक विभागाने पाण्याचा मारा केला. त्यानंतर अपघात झालेल्या परिसराला पोलिसांनी वेढा घातला आणि बिअर उत्पादक कंपनीच्या इतर अधिकाऱ्यांकडून रस्त्यावर पडलेल्या बिअर इतर वाहनाच्या मदतीने माघारी नेण्यात आल्या.

दरम्यान, कंटेनरच्या केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला अखेर अग्निशाम क विभाग व पोलिसांच्या मदतीने बाहेर काढण्यात आलं. चालक या अपघातामध्ये जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. हा अपघात नेमका कसा झाला? हे अद्याप समजू शकलं नाही. या प्रकरणाचा पुढील तपास वाळूज पोलीस करत आहेत.

# रोहित आणि विराट वनडे वर्ल्ड कप खेळणार की नाही, प्रशिक्षकांनी अखेर खरं सांगितलं..

**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि विराट कोहली आता फक्त भारताकडून वनडे क्रिकेटच खेळतात. वनडे वर्ल्ड कप २०२७ साली खेळवण्यात येणार आहे. पण हा वर्ल्ड कप रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळणार की नाही, हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. पण आता भारताच्या प्रशिक्षकांनीच याबाबतचं खरं उत्तर आता दिलं आहे.भारताने टी २० वर्ल्ड कप जिंकला आणि त्यानंतर रोहित शर्मा व विराट कोहली यांनी निवृत्ती घेतली. त्यानंतर इंग्लंडच्या दौऱ्यापूर्वी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना कसोटी संघाबाहेर जावे लागले. त्यामुळे आता हे दोघे फक्त वनडे क्रिकेट खेळत आहेत. यापूर्वी गौतम गंभीर यांना रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या भवितव्याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी गौतम गंभीर यांनी वर्ल्ड कपमध्ये कोण खेळेल, हे सांगता येणार नाही, असे म्हटले होते खरे. पण त्यानंतर रोहित आणि विराट यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर भारताचा संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेला होता. हा दौरा रोहित शर्माने गाजवला. कारण या दौऱ्यात रोहित शर्माने एक शतक आणि एक अर्धशतक झळकावत भारताकडून सर्वाधिक धावा केल्या होत्या. विराट कोहलीनेही अखेरच्या वनडेत अर्धशतक झळकावले होते. त्यानंतर आता भारतीय संघ वनडे मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेचा सामना करणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या वर्ल्ड कप समावेशाबाबत भारताचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल म्हणाले की, ' रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याविरुद्ध मी खेळलेलो आहे. या दोघांनी बऱ्याच गोलंदाजांची झोप उडवली होती. या दोघांचा सामना करण्यासाठी कठोर मेहनत करावी लागते. कारण हे दोघेही दिग्गज क्रिकेटपटू आहेत. हे दोघे जोपर्यंत मेहनत करत आहेत आणि आपला फिटनेस टिकवून आहेत, तोपर्यंत ते संघात असतील. हे दोघे मोठ्या स्पर्धेचे खेळाडू आहे, ज्यांनी आतापर्यंत भारताला बऱ्याच ट्रॉफी जिंकवून दिल्या आहेत. त्यामुळे वर्ल्ड कपमध्ये ते नक्कीच खेळू शकतात, असे मला तरी वाटते. कारण या दोघांकडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा दांडगा अनुभव आहे. या दोघांच्या अनुभवाचा संघाला चांगला फायदा होऊ शकतो. त्यामुळे मी या गोष्टीचे समर्थन करतो की, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी २०२७ साली होणारा वनडे वर्ल्ड कप खेळायला हवा.

वनडे वर्ल्ड कपसाठी आता दोन वर्षे आहेत, त्यामुळे रोहित शर्मा आणि विराट कोहली फिटनेस कायम राखून या स्पर्धेत खेळणार की नाही, याची उत्सुकता सर्वांना असेल.




# आयुष म्हात्रेने रोहित शर्माचा विक्रम मोडला आणि आता मिळाले भारताचे कर्णधारपद

**मुंबई :** आयुष म्हात्रेसाठी एकामागून एक गुड न्यूज येत आहेत. आयुष म्हात्रेने आजच्या दिवशीच रोहित शर्माचा एक मोठा विक्रम मोडीत काढला. त्यानंतर आयुष म्हात्रेला अजून एक गुड न्यूज मिळाली. आयुष म्हात्रेला आता भारताचे कर्णधारपद मिळाले आहे. आंतरराष्ट्रीय मानाच्या स्पर्धेत आता आयुष भारताचे नेतृत्व करणार असल्याचे समोर आले आहे.आयुष म्हात्रेने शुक्रवारी धडाकेबाज शतक झळकावले. बीसीसीआयच्या सय्याद मुश्ताक अली टी२० ट्रॉफी स्पर्धेत मुंबई आणि विदर्भ यांच्यात हा सामना झाला. या सामन्यात विदर्भच्या संघाने दमदार फलंदाजी करत १९२ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईची २ बाद २१ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण त्यावेळी संघ्याच्या मदतीला धावून आला तो आयुष म्हात्रे. आयुषने यावेळी फक्त ५३ चेंडूंत आठ




चौकार आणि ८ षटकारांच्या जोरावर नाबाद ११० धावांची खेळी साकारली आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.आयुषने या सामन्यात रोहित शर्माचा मोठा विक्रम मोडीत काढला. रोहित शर्माने वयाच्या १९ व्या वर्षी फर्स्ट क्लास, टी२० आणि लिस्ट ए या तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात शतक झळकावण्याचा पराक्रम केला होता. हा रोहित शर्माचा रेकॉर्ड आता आयुष म्हात्रेने मोडला आहे. आयुष म्हात्रेने वयाच्या १८ व्या वर्षी या तिन्ही क्रिकेटमध्ये शतक झळकावले असून तो तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये शतक झळकावणारा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे.आयुष म्हात्रेसाठी आता दुसरी गुड न्यूज आली आहे. कारण आयुष म्हात्रेला आता भारताचे कर्णधारपद मिळाले आहे. आशिया कप स्पर्धेत आता भारताचा १९ वर्षांखालील युवा संघ सहभागी होणार आहे, या संघाचे कर्णधारपद आता आयुष म्हात्रेला देण्यात आले आहे. या स्पर्धेत पुन्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. आयुष म्हात्रेने शतक झळकावत रोहित शर्माचा विक्रम मोडीत काढला, त्यानंतर आता त्याला भारताचे कर्णधारपदही मिळाले आहे.

# बॉडीगार्डने रोहितकडे येणाऱ्याला अडवलं पण हिटमॅनने जे केलं ते..

**रांची :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात कसोटी सामन्यांची मालिका रंगली. घरच्या मैदानावर असूनही भारताने ही मालिका गमावली. आता भारत एकदिवसीय मालिका खेळेल. पहिला एकदिवसीय सामना हा रांची, झारखंडमध्ये रंगणार आहे. भारतीय संघ आता रांचीमध्ये पोहोचला आहे. या दरम्यान रोहित शर्माचा एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. रोहितच्या कृतीचे आता सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. रांचीच्या एका रहिवाशाने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे ज्यामध्ये रोहित शर्मा रांची विमानतळावरून बाहेर पडताना दिसत आहे. तेवढ्यात, भारतीय खेळाडू शाहबाज नदीम त्याला स्वागत करण्यासाठी बाहेर येतो. सुरक्षा रक्षक नदीम ओळखू शकत नाहीत. रोहित शर्मा नंतर सुरक्षा रक्षकांना सांगतो, 'अरे, भाऊ, हा आमचा मित्र आहे. तो आमची काळजी घेणार आहे.' त्यानंतर रोहित शर्माने शाहबाज नदीमला मिठी मारली. हाच व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्य३ प्रमाणात व्हायरल होत आहे.

रोहितचा हाच स्वभाव चाहत्यांना खूप आवडतो.रोहित शर्मा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात सहभागी होण्यासाठी रांचीमध्ये पोहोचला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना रविवारी रांची येथे खेळला जाणार आहे. गुरुवारी सराव करून या हिटमॅनने आपल्या तयारीची चाचणी घेतली. माजी भारतीय कर्णधाराने फलंदाजीचा सराव केला आणि क्षेत्ररक्षण सत्रातही भाग घेतला. रोहित शर्मा सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध नुकत्याच संपलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत रोहितने एक शतक आणि एक अर्धशतक झळकावले.

# स्मृती मानधनाचं लग्न पुढे ढकललं पण मैदानात लवकरच उतरणार




**मुंबई :** स्मृती मानधनाचं लग्न काही तासांवर येऊन ठेपलेलं होतं. पण त्यापूर्वी स्मृतीचे वडील श्रीनिवासन यांना हार्ट अटॅक आला आणि त्यामुळे तिचं लग्न पुढे ढकलण्यात आलं. आता स्मृती आणि पलाश यांचं लग्न नेमकं कधी होईल, हे सांगता येणार नाही. पण आता स्मृती मैदानात कधी उतरणार, हे मात्र आता समोर आले आहे. स्मृती कोणत्या दिवशी मैदानात पुन्हा पाय ठेवणार, याची माहिती आता समोर आली आहे.

स्मृती मानधना ही भारताच्या वर्ल्ड कप विजेत्या संघाची रणरागिणी होती. कारण वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक धावा या स्मृतीच्या नावावर होत्या. भारताच्या महिला संघाने प्रथमच वर्ल्ड कप जिंकला आणि स्मृती पुन्हा एकदा प्रकाशझोतात आली. या विजयानंतर पलाशही स्मृतीला मैदानात भेटला. या दोघांनी भारताच्या विजयाचं जोरदार सेलिब्रेशन केलं. डी. वाय. पाटील मैदान हे भारतीय संघाबरोबरच स्मृती मानधनासाठीही खास ठरलं. कारण याच मैदानात त्यानंतर पलाशने स्मृतीला प्रपोज केलं, त्यामुळे स्मृती हे मैदान कधीच विसरणार नाही. पण आता वडिलांच्या प्रकृतीमुळे स्मृतीला लग्न पुढे ढकलावं लागलं आहे. त्यामुळे स्मृतीचं लग्न आता कधी होईल, याची तारीख समोर आलेली नाही. पण स्मृती मैदानात कधी उतरणार, याची तारीख मात्र आता समोर आली आहे.स्मृतीच्या आयुष्यात जे काही घडलं ते सार विसरण्यासाठी तिला क्रिकेटची चांगली मदत मिळू शकते. त्यामुळे ती लवकरच भारतीय संघात परतणार असल्याचे समोर येत आहे. वर्ल्ड कपनंतर आता भारताचा सामना श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघाबरोबर होणार आहे. श्रीलंकेचा संघ भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील महिला संघांमध्ये पाच टी २० सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २१ डिसेंबरला होमार आहे. या मालिकेतील पहिले दोन सामने विशाखापट्टणम येथे होणार आहेत, त्यानंतरचे तीन सामने तिरुवनंतरपुरम येथे खेळवले जाणार आहेत. त्यामुळे स्मृती आता २१ डिसेंबरला मैदानात उतरू शकते, असे म्हटले जात आहे. स्मृतीचं लग्न आता पुढे ढकललं आहे, पण ती मालिकेपूर्वी लग्न करणार, असे तरी सध्याच्या घडीला दिसत नाही. त्यामुळे स्मृती आता सर्वांना क्रिकेटच्या मैदानातच प्रथम पाहायला मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# मी घरी स्टाफशी मराठीत बोलतो, पण भाषासक्तीवरुन मारहाण चुकीची! मराठी भाषेबाबत काय म्हणाले सुनील शेट्टी



**मुंबई :** गेला काही काळ महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा वाद जोरदार उसळला आहे. अनेक परप्रांतीय लोक महाराष्ट्रामध्ये दादागिरी करतात. किंवा काही वेळेस मराठी माणसं परप्रांतीयांवर मराठी भाषा शिकण्यावरून वाद घालतात ही प्रकरण सतत चालू आहे. यावरून अनेकदा राजकारण सुद्धा भडकलेले दिसते.मराठी भाषा वादावर अनेक सेलिब्रिटी मंडळींनी सुद्धा त्यांचे मत व्यक्त केले आहे. काहींनी परप्रांती असून सुद्धा आपण महाराष्ट्रात राहतो म्हणजे मराठी यायलाच पाहिजे असं मत व्यक्त केलं. अशातच आता अभिनेते सुनील शेट्टी यांचे वक्तव्य समोर आले आहे. अभिनेते सुनील शेट्टी यांना भाषेवरील राजकारण आणि त्यातून होणारा हिंसाचार याबाबत प्रश्न विचारला. याचे उत्तर देताना ते म्हणाले की 'मराठी भाषेवरून राजकारण करणे आणि सक्तीने बोलायला लावण्यासाठी हिंसाचार करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. गरीब माणसाला मारहाण करून काही साध्य होणार नाही.'सुनील शेट्टी पुढे म्हणाले की, 'मी स्वतः मुंबईकर आहे. या शहराने मला नाव, यश प्रतिष्ठा सगळं काही दिलं. म्हणूनच मी नेहमी मनापासून सांगतो की मुंबईत राहायचं असेल तर मराठी बोलणं आणि शिकणं अत्यंत आवश्यक आहे. आपण जिथे राहतो तिथल्या भाषेत बोललो की त्या ठिकाणच्या लोकांचे आपल्याला प्रेम आणि आदर दहापटीने मिळते.'मी घरी माझ्या स्टाफशी नेहमीच मराठीत बोलतो पण हेही तितकंच खरं आहे की माझ्या भाषा शिकण्यासाठी किंवा ती भाषा बोलायला लावण्यासाठी कोणावरही जबरदस्ती झाली नाही पाहिजे. आपल्या स्वतः च्या लेकराला जबरदस्तीने काही शिकवता येत नाही मग दुसऱ्याला का तसे करायला भाग पाडायचे? अभिनेते सुनील शेट्टी यांनी मांडलेल्या या मतावर प्रेक्षक खुश झाले आहेत. अनेकांना त्यांचे मत पटले असून ते घरी आपल्या स्टाफशी मराठीत बोलतात हे ऐकून सगळ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला आहे.'अभिनेते सुनील शेट्टी यांनी हे एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितले. त्यांच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास लवकरच ते केसरी वीर या सिनेमातून प्रेक्षकांना भेटायला येणार आहे

## नव्या घरात पार पडला सूरज चव्हाणचा हळद समारंभ; बोहल्यावर चढण्यासाठी सज्ज

**मुंबई :** सूरज चव्हाण लवकरच बोहल्यावर चढणार आहे. त्याच्या घरी लगीनघाईला सुरुवात झाली असून २८ नोव्हेंबर रोजी घाणा, बांगड्या भरण्याचा कार्यक्रम आणि हळद समारंभ मोठ्या थाटामाटात पार पडला. डीरिक्ष उहरींप च्या या लग्नापूर्वीच्या विधींचे खास फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियाद्वारे समोर आले आहेत. अद्याप सूरजने या विधींविषयी पोस्ट केली नसली तरी, नेटकऱ्यांनी शेअर केलेले व्हिडिओ समोर आले आहेत. ज्यावर सूरजच्या चाहत्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.सूरजने त्याच्या लग्नाच्या काही दिवस आधीच त्याच्या नव्या घरात प्रवेश केला होता. बारामतीमधील मोढवे गावात त्याचा नवीन बंगला आहे. आता याच घरात त्याच्या हळदीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी खास रांगोळी, फुलांची सजावट करण्यात आली होती. सूरजच्या बहिणींसह गावातील इतर सदस्यही यावेळी उपस्थित आहेत. सूरजने यावेळी हातावर मेंदीही काढून घेतली.सूरजच्या होणाऱ्या पत्नीचे नाव संजना असे असून ती त्याच्या चुलत मामाची मुलगी आहे. त्यांचे प्रीवेडिंग फोटोशूट आणि लग्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या समारंभासाठी उपस्थित राहणाऱ्या कलाकारांची यादीही पत्रिकेत देण्यात आली आहे. व्हायरल झालेल्या पत्रिकेनुसार प्रमुख उपस्थिती म्हणून अजित पवार आणि त्यांच्या पत्नी सुनित्रा अजित पवार, तसेच सुप्रिया सुळे, आमदार विजय बापू शिवतारे, संजय जगताप, अशोक टेकवडे आणि इतर काही राजकीय मंडळी या लग्नाला



येणार आहेत. तसेच बीटाऊनमधील रितेश देशमुख, अक्षय कुमार ही मंडळी तसेच अशोक सराफ, पॅडी कांबळे, वर्षा उसगावकर हे दिग्गज उपस्थित राहणार आहेत. इझच५ मधील इतर सदस्यांसह सूरजच्या सिनेमातील कलाकारही या लग्नाला येतील, असा अंदाज आहे. जेजुरीजवळ सासवड याठिकाणी हा लग्नसोहळा पार पडणार आहे.दरम्यान गेले काही दिवस सूरजच्या लग्नाची जोरदार चर्चा आहे. बिग बॉस मराठी ५ च्या घरातील सूरजची बहीण म्हणजेच, कोकण हार्टेड गर्ल अंकिता प्रभू वालावलकर हिने सूरजच्या लग्नाच्या शॉपिंगसाठी खूप मदत केली होती. तिने या शॉपिंगचा व्लॉग तिच्या युट्यूबवरर शेअर केला असून, त्यावेळीच तिने सूरजच्या होणाऱ्या पत्नीचा चेहरा सर्वांना दाखवला होता. संजना आणि सूरजच्या बहिणींच्या साडी शॉपिंगसह नवरदेवाच्या कपड्यांचंही शॉपिंग करायला अंकिताने मदत केली.

## दत्तजयंती निमित्ताने 'जय जय स्वामी समर्थ' मालिकेत होणार त्रिदेव रुप दर्शन

**मुंबई :** दत्तजयंतीच्या मुहूर्तावर कलर्स मराठी वाहिनीवर ' जय जय स्वामी समर्थ ' या मालिकेत खास भागांचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ४ डिसेंबर २०२५ रोजी दत्तजयंती आहे. अनेक ठिकाणी हा सोहळा थाटामाटात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने 'जय जय स्वामी समर्थ' मालिकेचे निर्माते प्रेक्षकांसाठी एक भावपूर्ण आणि आध्यात्मिक कथा घेऊन येत आहेत. दत्तजयंती विशेष सप्ताहाच्या स्वरूपात हे कथानक पाहायला मिळेल.येत्या ४ डिसेंबर ते १० डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता हे विशेष भाग प्रसारित होतील. या भागांमध्ये दत्त अवताराचं रहस्य, भक्तांवर असणारी त्यांची कृपा आणि ब्रह्मा-विष्णू-महेश या त्रिदेवांच्या शक्तींचा एकत्रित अनुभव या भागांमध्ये मांडण्यात येणार आहे. स्वामींचं त्रिदेव रूप दर्शन या भागांमध्ये पाहायला मिळेल. दत्त अवताराची कथा सलग आठवडाभराच्या भागात विस्ताराने अनुभवायला मिळणार आहे.दरम्यान ही विशेष कथा रंजना नावाच्या एका तरुणीच्या संघर्षमय आयुष्याभोवती फिरते. जिथे काका-काकूंचा छळ, भावाचा जीवघेणा आजार आणि गावगुंड अभिरामच्या अत्याचारामुळे तिचं आयुष्य उद्ध्वस्त झालेलं दाखवण्यात आलं आहे. आजच्या काळाचे प्रतिबिंब दाखवण्याचा प्रयत्न रंजनाच्या पात्रातून करण्यात आला आहे. तसेच हतबल झालेल्या रंजनाच्या हाकेला स्वामी कसे उत्तर देतात आणि प्रत्यक्ष स्वामी समर्थ तीन रूपांत कसे प्रकट होतात, हे यामध्ये पाहता येईल. त्रिदेवांच्या रुपात स्वामी समर्थ प्रकट झाल्यानंतर नेमका काय चमत्कार घडेल, याचे उत्तर दत्तजयंती विशेष सप्ताहात मिळेल. कलर्स मराठीच्या या लोकप्रिय मालिकेत अभिनेता अक्षय मुदवाडकर मुख्य भूमिकेत आहे. त्याने साकारलेल्या स्वामी समर्थांच्या भूमिकेचे नेहमीच विशेष कौतुक झाले आहे. गेल्या ५ वर्षांपासून तो ही भूमिका साकारत असून, आतापर्यंत तो या मालिकेत विविध रुपांमध्ये दिसून आला आहे.

## पूर्णा आजीचं स्वर्गात नवऱ्यासोबत बर्थडे सेलिब्रेशन, लेकीने शेअर केला अरव फोटो; चाहते भावूक

**पुणे :** अभिनेत्री तेजस्विनी पंडित सध्या तिच्या कठीण काळातून जात आहे. काही महिन्यांपूर्वी तिच्या आयुष्यातलं सर्वात जवळचा व्यक्तिमत्व तिने गमावलं. तेजस्विनी पंडित हिची आई अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे ऑगस्ट महिन्यात निधन झाले. त्यामुळे तिच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. काही वर्षांपूर्वी तिच्या वडिलांचे सुद्धा निधन झालेले. बहिणीचे लग्न झाल्यामुळे ती तिच्या आईसोबत राहायची. तिच्या आईची उत्तम काळजी घ्यायची. पण अचानक आईच्या निधनामुळे तिच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.तेजस्विनी पंडित सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. तिची आई म्हणजे अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे ऑगस्ट महिन्यात निधन झाल्यापासून तिने अनेक गोष्टी सोशल मीडियावर शेअर करत आपले दुःख व्यक्त केले आहे. नुकताच तिने आपल्या इंस्टाग्राम स्टोरीवर आपल्या आई-बाबांचा एक गोड फोटो शेअर केला. निमित्त होतं तिच्या वडिलांचा वाढदिवस. त्या फोटो सोबत तिने कॅप्शनमध्ये लिहिणे की आय मिस यु आणि हॅपी बर्थडे... या वेळेला एकट्याने नाही आईबरोबर छान साजरा करा....! तिने आणखीन एक आईवडिलांचा एडिट केलेला फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये तिचे आई-बाबा स्वर्गात बसून वाढदिवसाचं सेलिब्रेशन करताना दिसतायत. यावरही तिने आय





लव यू आई बाबा असं लिहिलंय.अभिनेत्री ज्योती चांदेकर यांच्या बद्दल बोलायचे झाल्यास त्यांनी इंडस्ट्रीमध्ये मालिका नाटक आणि सिनेमा या सर्व क्षेत्रांमध्ये काम करून प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण केले होते. पण स्टार प्रवाह वरील ठरलं तर मग या मालिकेतली पूर्णा आजी प्रेक्षकांना फार भावली. अचानक त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसलेला. पूर्णाआजीची जागा कोणीच घेऊ शकत नाही असा त्यांनी सूर पकडलेला. सध्या या मालिकेमध्ये ज्योती चांदेकर यांची जागा अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांनी घेतली आहे.तेजस्विनी पंडित हिच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास ती शेवटची येरे येरे पैसा ३ या सिनेमांमध्ये दिसलेली. याशिवायती आता निर्माती म्हणून सुद्धा काम करत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एचआयव्ही नियंत्रणासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा- जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार

**जनसंचलन/बुलढाणा**

एचआयव्ही संसर्गाचा नियंत्रणासाठी एड्स कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ठ काम सुरु असून संसर्गाचे प्रमाण दरवर्षी कमी होत आहे. संसर्गाचे प्रमाण शून्यापर्यंत येण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणा, जोखमीचे घटक, अशासकीय संस्था व विशेषता तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी केले. जिल्हा क्षयरोग प्रतिबंध व नियंत्रण विभाग तसेच जिल्हा रुग्णालय, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आनंद भुजारी, सहाय्यक आयुक्त गजानन घिरके, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद टाळे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शेवाळे आदी उपस्थित होते. एचआयव्ही नियंत्रण कार्यक्रमामध्ये इंटेन्सिफाईड आयइसी कॅम्पेनमध्ये विशेष कार्य केलेल्या आयसीटिसी कर्मचारी संदिप गोंड, सतिश डामरे, गजानन लहासे, अशोक महाले, सारिका खंडारे, अनिकेत गाडेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रश्नमंनुषा, चित्रकला व निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्यांना प्रमाणपत्र व रोख बक्षीस देण्यात आले. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी व सहायक आयुक्त गजानन घिरके यांनी एचआयव्ही संसर्गाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयक गजानन देशमुख यांनी संचालन केले तर आभार लक्षीकांत गोंदकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदिप राऊत, भागवत कव्हळे, करुणा घोडेस्वर, सीमा देशपांडे, नरेंद्र सनांते, भारत कोळे, इंदू मोरे, पियुष मालगे, प्रवीण बंबटकार, मिलींद इंगोले, दीपक गवई, मंगला उमाळे आणि नेटवर्थ टीम बुलडाणा यांनी परिश्रम घेतले.

# कुष्ठरुग्ण शोध अभियान जिल्हास्तरीय आढावा बैठक संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

कुष्ठरुग्ण शोध अभियानांतर्गत प्राथमिक फक्फआढावा घेण्यात आला. यावेळी कुष्ठरुग्ण शोध मोहिम अंतर्गत सर्व नागरिकांची तपासणी करावी, जास्तीत जास्त संशयित रुग्ण शोधून त्यांचे स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून निदान निश्चित करावा. नव्याने आढळणाऱ्या कुष्ठरुग्णांना त्वरित उपचार सुरू करावा, अशा सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना दिल्या. जिल्हा परिषदच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा बैठक नुकतीच घेण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. के. व्ही. राठोड, सहाय्यक संचालक डॉ. हरी पवार, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. डॉ. के. व्ही. राठोड यांनी कुष्ठरोग आजार, त्याचे निदान, उपचार पद्धती तसेच चालू अभियानातील तांत्रिक बाबींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# ॲक्युपंक्चर जनजागृती दिन मोठ्या उत्साहात साजरा....





**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद मुंबई द्वारा दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ ते २२ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान जागतिक स्तरावर ॲक्युपंक्चर जनजागृती दिन म्हणून साजरा केला जातो. याच अनुषंगाने स्किल एक्यूपंक्चर कॉलेज व हॉस्पिटल बुलढाणा येथे या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सचिन सुपे सर यांनी केले. ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती बद्दल सर्वसामान्य पर्यंत, नागरिकापर्यंत, पालकां पर्यंत, वेगवेगळ्या कार्यक्रमांतर्गत विविध व्याधी वरील ॲक्युपंक्चर उपचारांचे फायदे, आणि त्यांचे महत्त्व तज्ञांनी कार्यशाळा व प्रात्यक्षिके याद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करून पटवून दिले. ॲक्युपंक्चर चिकित्सा ही प्राचीन थेरपी आहे त्यामध्ये वेगवेगळे व्याधींवर कुठल्याही प्रकारची रुग्णाला हानी न होता, विना औषध व दुष्परिणाम मुक्त उपचार केला जातो. हा संदेश आपल्या स्किल ऍक्युपंक्चर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यद्वारे आणि रॅली द्वारे जनजागृती अभियानाद्वारे रुग्णांच्या व जनतेच्या हृदयापर्यंत हा संदेश पोहोचविला. येळगाव परिसर, व बस स्थानक परिसर चौका चौकात तसेच भाडगणी तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणा या ठिकाणी सुद्धा या कार्यक्रमाचे आयोजन मोफत शिबिरात द्वारे करण्यात आले. रुग्णांना तात्काळ आराम पडतो. ही जादुई किमया फक्त ॲक्युपंक्चर तज्ञच थेरपीद्वारे करू शकतात तसेच कुठल्याही प्रकारची शारीरिक इजा ही होत नाही हाच संदेश विद्यार्थ्यांनी रॅलीद्वारे व पथनाट्याद्वारे लोकापर्यंत पोहोचविला. मानवाचे जीवन अनेक व्याधींनी पोखरलेले आहे तसेच त्याला नैसर्गिक जीवन जगता यावे आपल्या जीवनशैलीमध्ये थोडाफार बदल करून आनंदी जीवन कसे जगता येईल हा संदेश ॲक्युपंक्चर तज्ञ प्राध्यापक संजय सोनोने सर व प्राध्यापक उमेश साळवे सर यांनी उपस्थिता पर्यंत पोहोचविला. सुई चिकित्सा पद्धती वापरून पायदुखी, गुडघेदुखी,कंबर दुखी,मानदुखी , आणि इतर आजारावर सुद्धा ही थेरपी वापरून रुग्णाला तात्काळ आराम कशाप्रकारे पडतो हे आपल्या जादुई सुई चिकित्सा पद्धती वापरून कोणतीही शारीरिक इजा न होता शिबिरामध्ये व आयोजित केलेल्या रॅली द्वारे दाखवून दिले. सुई नाही त्रासाची सुई आहे उपचाराची, याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी ॲक्युपंक्चर तज्ञ प्राध्यापक संजय सोनोने सर, प्राध्यापक उमेश साळवे सर, प्रा .कोमल लटके, सर्व कर्मचारी वर्ग , ॲक्युपंक्चर कॉलेजचे सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी तसेच यांनी या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले.

# सहकार विद्या मंदिर, बुलढाणाच्या विद्यार्थ्यांचे विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षेत सुयश....

**जनसंचलन/बुलढाणा**

विद्यार्थ्यांना भारतीय संशोधकांचे योगदान परीचीत करुन देणे व प्रत्यक्ष कृतीतून विज्ञान आत्मसात करणे या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या विद्यार्थी विज्ञान मंथन द्वारा आयोजित सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रांत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये सहकार विद्या मंदिर, बुलढाणाच्या विद्यार्थ्यांनी विशेष यश आप्त केले. चि. कौस्तुभ खोबरागडे, वि. शशांक देवकर, कु. मृण्मयी मगर या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय शिबीराकरीता निवड झालेली आहे. ही परीक्षा विविध स्तरावर घेण्यात येते. यामध्ये प्रथम स्थरावर वरील विद्यार्थ्यांनी यश संपादन करुन द्वितीय स्थरावरील परीक्षेत चि. शशांक देवकर (५४ गुण), चि. कौस्तुभ खोबरागडे (५२ गुण),




कु. मृण्मयी मगर (५२ गुण) घेवून राज्यस्तरीय शिबीराकरीता यांची निवड झालेली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय भाईजी, बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. श्री. सुकेश झंवर व संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात. विद्यार्थीनी त्यांच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, शिक्षक यांना दिले आहे.



# खोटे गुन्हे रद्द करण्याची मागणी
# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदन...

**जनसंचलन/बुलढाणा**

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव पंचायत समितीमध्ये सिंचन विहिरीचे व गाय गोठ्याचे अनुदान का दिले नाही असा जाब विचारला असता सेनगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी शेतकरी नेते गजानन कावरखे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले आहे. म्हणून क्रांतिकारी शेतकरी संघटना बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने मा. जिल्हाधिकारी साहेब यांन निवेदन देऊन खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे अशी मागणी करणात आली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे २६ नोव्हेंबर रोजी गजानन कावरखे, विजय वानखेडे व प्रवीण मते हे तालुक्यातील शेतकरी बांधव व घरकुल लाभार्थ्यांसोबत कामानिमित्त सेनगाव पंचायत समिती कार्यालयामध्ये गेले असता कार्यालयातील कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे आढळले. संविधान दिन व २६/११ तील शहिदांना श्रद्धांजली पर कार्यक्रम दुपारी १ वाजेपर्यंत न झाल्याची बाबही तिथे निदर्शनास आली. हि संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकार्यांना फोन द्वारे देण्यात आली असून पत्रकार बांधवांनी त्या वेळचे व्हिडीओ चित्रीकरण केलेले आहे. सर्व विभाग रिकामे असल्याचे पत्रकारांनी फ `सबुक चित्रीकरण करून दाखवले. मात्र गटविकास अधिकाऱ्यांनी चुकीची व तथ्यहीन फिर्याद दाखल करत सेनगाव पोलीस स्टेशन मध्ये शासकीय कामात अडथळा व विविध कलमाद्वारे गुन्हे दाखल केले आहे. असे दाखल केलेले खोटे गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावे. व गटविकास अधिकारी यांची संपुर्ण चौकशी करण्यात यावी. अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. जर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेतले नाही तर बुलढाणा जिल्ह्यात क्रांतिकारी शेतकरी



संघटनेच्या वतीने मोठे आंदोलन छेडण्यात येईल. असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमोल मोरे, महेंद्र जाधव, गजानन बापू देशमुख, सुरेश पवार, आमीन खांसाब, सतीश सुरडकर, नितीन सोनटक्के, पवन काकडे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक रक्कम / गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# वैज्ञानिक बलून उड्डाणे सुरू, जिल्ह्यात उतरण्याची शक्यता

**जनसंचलन/बुलढाणा**

टाटा मूलभूत संशोधन संस्था, हैदराबाद, भारत सरकारचा अणू ऊर्जा विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ डिसेंबरपर्यंत उच्च क्षोभमंडलीय वैज्ञानिक बलून उड्डाणे सुरू आहेत. वैज्ञानिक प्रयोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या या बलून साधनांची उंची ३० ते ४२ किमीपर्यंत पोहोचते आणि प्रयोग पूर्ण झाल्यानंतर ती पॅराशूटच्या सहाय्याने जमिनीवर उतरतात. ही उपकरणे बुलढाणा जिल्ह्यात उतरण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांनी अशा प्रकारचे बलून उपकरण किंवा पॅराशूटसह वस्तू आढळल्यास त्यांना उघडणे, हलवणे किंवा छेडछाड न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशी कोणतीही वस्तू दिसल्यास तत्काळ स्थानिक तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन विभागाला ताबडतोब कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाला किंवा माहिती द्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी केले आहे.


